प्रकरण सहावे

# सामाजिक आणि वाङ्मयीन मूल्यमापन

१. सामाजिक मूल्यमापन

२. वाङ्मयीन मूल्यमापन

३. निष्कर्ष

# प्रकरण सहावे

---

## सामाजिक आणि वाङ्मयीन मूल्यमापन

---

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. सामाजिक जीवनामध्ये सुखदु:खाचे अनेक प्रसंग प्रत्येक व्यक्तिच्या वाट्याला येत असतात. त्या सुख दु:खाच्या प्रसंगाने मानवी जीवन वाटचाल करत असते. दु:खद अनुभव वाट्यास आले तर जीवनप्रवाह खंडित होत नसतो. दु:ख पचविण्याची क्षमता ही मानवी जीवनाची अपरिहार्यता असून दु:खाचे विस्मरण करत आयुष्यक्रम गतिशील केला जातो. या सुखदु:खाकडे पाहण्याची काहींची दृष्टी खेळकर असते व काहींची दृष्टी गंभीर असते. इथूनच या कलेच्या प्रांतामध्ये वास्तववादी आणि रंजनवादी कलेचा जन्म झाला. साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य या सर्व दृक आणि श्राव्य कलांमध्ये उपरोक्त अनुभव कमी अधिक प्रमाणात मांडला जातो.

साहित्य या प्रांतातील महत्त्वाचा वाङ्मय प्रकार नाटक हा दृक आणि श्राव्य अशा या वाङ्मय प्रकाराची प्रमुख लक्षणे असल्यामुळे वास्तव जीवनानुभूती व रंजनानुभूती प्रत्यक्ष समूह मनावर बिंबवणारा हा कलाप्रकार आहे. त्यामुळे सामाजिक गती अधिक प्रभावीपणे मांडणे आणि त्याच्या आस्वादात रमणे या दोन्ही क्रिया अधिक फलद्रुप होतात. म्हणूनच असे म्हणता येईल की, साहित्य प्रकारातील नाटक हा एक कलाप्रकार असून त्याला समाजाचे अधिष्ठान आहे. किंबहुना समाज ही खुली रंगभूमीच आहे. वस्तुत: दैनंदिन व्यवहारात व समाजात अनेक नाट्यपूर्ण प्रसंग हरघडी घडतच असतात. सुख-दु:ख, राग-लोभ, भाव-भावना, अडी-अडचणीमुळे मानवी जीवन संघर्षमय झालेले असते. याचेच प्रतिबिंब साहित्यात पडलेले असते. या संदर्भात अविनाश सहस्त्रबुद्धे म्हणतात की, "सामाजिक, राजकीय, आर्थिक, तात्त्विक, नैतिक अशा अनेक पाकळ्यांचे संदर्भ जसे जीवनाला असतात तसेच ते साहित्यालाही असतात. श्रेष्ठ साहित्यकृतीचे मूल्य केवळ वाङ्मयीन नसते. ते सामाजिक असते. मानवी अनुभवाचा सखोल अर्थ व आकार श्रेष्ठ साहित्यकृतीत व्यक्त झालेला असतो. त्या सखोल अर्थकाराची मीमांसा जीवनविषयक सखोल प्रत्ययाशीच निगडित असते. वाङ्मयीन महात्मता ही जीवनाची महात्मता सूचित करीत असते आणि जीवनाची महात्मता जीवन प्रेरणेच्या, जीवनवृत्तींच्या मार्मिक जाणिवेखेरीज आकलन होणे कठीण असते. कारण अशी जाणीवही सामाजिक कक्षेतच अर्थपूर्ण असते."[१] सहस्त्रबुद्धे यांच्या मतानुसार साहित्याला सामाजिक संदर्भ

असतात. त्यामुळे साहित्यकृतीचे मूल्य केवळ वाङ्मयीन न राहता मानवी अनुभवाचा, जीवन प्रेरणाचा, जीवनवृत्तीचा स्पर्श साहित्यकृतीला असतो. त्यामुळे साहित्यकृतीतील जाणीव, अनुभव हा समाजातील जीवनजाणिवांशी निगडित असतो व सामाजिक कक्षेतच अर्थपूर्ण होतो. यावरूनच साहित्य व समाज यांचा सहसंबंध स्पष्ट होतो.

साहित्य आणि समाज यांचा सहसंबंध लक्षात घेता असे दिसून येते कि, अनेक पुरोगामी आणि विधायक विचार नाट्यवाङ्मयाने समाजासमोर मांडले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात परंपरागत रूढी व्यवस्थेमुळे व प्रतिगामी विचारसरणीमुळे निर्माण झालेली समाजस्थिती, लोकांमध्ये असणारी पारतंत्र्याची जाणीव आणि दु:ख, विषम समाजरचना, कुटूंबापासुन  समाजापर्यंत असणाऱ्या समस्या, त्यांचा जनमानसावर होणारा अनुकूल व प्रतिकूल परिणाम यांची दखल नाट्यवाङ्मयाने घेतली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकांच्यात निर्माण झालेली स्वातंत्र्यतेची जाणीव लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार, घटनेने व कायद्याने दिलेले अधिकार व कर्तव्ये बदललेली समाजरचना, कुटूंबव्यवस्था यांसारख्या स्थित्यंतरांचाही ठसा नाट्यवाङ्मयावर पडला आहे. म्हणजे साहित्याचा समाजावर व समाजाचा साहित्यावर परिणाम होतो म्हणूनच साहित्यातून काही सामाजिक निष्कर्ष काढता येतात.

## १. सामाजिक मूल्यमापन :

विवाहाची समस्या आणि मराठी नाटक या विषयाच्या अनुशंगाने मराठीमध्ये अनेक नाट्यकृती उदयास आलेल्या आहेत. बालजरठ विवाह ते आंतरजातीय विवाह असा मराठी नाटकाचा विस्तारीत आलेख मांडता येऊ शकतो. त्या संदर्भात सविस्तर विवेचन पहिल्या प्रकरणात केलेले आहे. येथे केवळ आंतरजातीय विवाहाच्या समस्येशी निगडित 'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?', व 'बामनवाडा' या चार नाटकांचाच विचार केला आहे. या चारीही नाटकांचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन करताना नाटककारात्ची सामाजिक बांधिलकी व समाजसापेक्ष दृष्टीकोन तपासणे आवश्यक आहे. समाजात असणाऱ्या समस्यांकडे लेखक कोणत्या दृष्टीने पाहतो, त्याचे चित्रण तो साहित्यात कशा प्रकारे मांडतो, वास्तव चित्रण करतो की काल्पनिक, पारंपरिक संकेत पाळतो याचा विचार येथे सामाजिक मूल्यमापन करताना आवश्यक आहे.

तेंडुलकरांनी 'कन्यादान' नाटकात आंतरजातीय विवाह घडवून कौटुंविक स्तरावर होणारा सांस्कृतिक व जातीय संघर्ष चित्रित केला आहे. समाजमान्य विवाहपद्धत नाकारल्याने संस्कृतीतील फरकाने होणारी भावनिक कुचंबणा, कोंडी मांडलेली आहे.

आंतरजातीय विवाहाकडे एक सामाजिक प्रयोग म्हणून पाहण्याची दृष्टी आणि माघारी फिरता येत नाही म्हणून अपरिहार्यपणे त्या मार्गावरून चालण्याची सक्ती याचे चित्रण तेंडूलकरांनी सक्तीने केल्यासारखे वाटते.

दत्ता भगत यांनी 'वाटा पळवाटा' नाटकात डॉ. आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्यांतील वैचारिक संघर्षातून दलित चळवळीची होणारी स्थिती व समाजातील छुपी जातीय मानसिकता, दलित सवर्ण संघर्ष याचे वास्तव चित्रण करून या अशा प्रतिकूल परिस्थितीतही माणूसकी जपणारा आंतरजातीय विवाह अशी रचना केली आहे. ब्राह्मण आणि दलित असा आंतरजातीय विवाह घडवून आणून जातिनिर्मूलनाचा एक सामाजिक मार्ग म्हणून आशावादी दृष्टीने भगत नाटकाची रचना करतात.

संजय पवार यांनी 'कोण म्हणतं टक्का दिला?' नाटकात शुक्राचार्य, देवयानी कचऱ्याच्या पौराणिक मिथक कथाचा वापर करून समता विनिमय कायद्याची कल्पना करून पौराणिक मिथक कथाच्या आधारे नाटकाची रचना केली आहे. पौराणिक काळातील देवकुळ, राक्षस कुळ व आधुनिक काळातील जातीय व्यवस्था यांचा संबंध लक्षात आणून देवून प्रेम प्रकरणातून आंतरजातीय विवाह घडवून आणला आहे. प्राचीन काळातील विवाह व आधुनिक काळातील विवाहाचे चित्रण करताना कुळाबद्दल, जातीबद्दल समाजात बदल झालेला नाही हेच नाटककार सुचवताना दिसतात.

रामनाथ चव्हाण यांनी 'बामनवाडा' नाटकात आंतरजातीय विवाहाने दलित तरूण आपली 'दलित' जात सोडून सवर्ण बनण्यासाठी धडपडतो याचे चित्रण येते. जातीयता मोडायला निघालेला दलित तरूण संकुचित मनोवृत्तीचा होवून सवर्ण बनण्याचा प्रयत्न करत आहे. आपल्या समाजापासून दूर जावून आंतरजातीय विवाहाच्या मार्गाने आपली जात मोडित काढण्याचा प्रयत्न करत आहे मात्र या दलित तरूणाला त्याचा समाजही स्विकारत नाही व सवर्ण समाजही स्विकारत नाही त्यामुळे त्यांची कोंडी होते. शिक्षणाने उच्च पदावर नोकरी करणारा दलित व सवर्ण यांच्यातील संघर्ष दाखविण्याबरोबरच दलितातील सवर्ण बनण्याच्या आग्रहाने त्याच्या कुटूंबाला आणि एकंदरित स्र्व समाजाला त्याचे दुष्परिणाम सोसावे लागतात कारण माणसाच्या मनातील जातिभेद आजही आस्तित्वात आहे याचे चित्रण नाटककार समर्थपणे करतो.

दलित रंगभूमीवरील 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला' व 'बामनवाडा' या तिनही नाटकात आंतरजातीय विवाहाने होणारा जातीवरील वैचारिक संघर्ष चित्रित करून माणसाच्या मनातील जातीयता लोप पावली नाही हे स्पष्ट केले आहे. तर तेंडुलकरांच्या 'कन्यादान' मध्ये मात्र विशिष्ट संस्कारात वाढलेली व्यक्ती

तिच्या मानसिकतेमध्ये पूर्णपणे सुधारणा होणार नाही असा निष्कर्ष काढतात. तेंडुलकर हे उच्चवर्णीय समाजात वाढल्याने त्यांची ही मानसिकता किंवा त्यांच्या लेखनाची ही मर्यादा येथे जाणवते.

या नाटकांचे सामाजिक मूल्यमापन करताना नाटककाराची सामाजिक बांधिलकी व समाजसापेक्ष दृष्टिकोन ओघानेच येतो.

'कन्यादान' नाटकाचे सामाजिक मूल्यमापन करताना हे स्पष्ट होते की तेंडूलकर प्रस्थापित, पारंपरिक दृष्टीकोन ठेवून लेखन करताना दिसतात. नाटकातील व्यक्तिरेखांचे रेखाटन करताना तेंडुलकरांनी सुष्ट व दुष्ट अशा दोन टोकाच्या व्यक्तिरेखा चित्रित करून सवर्ण म्हणजे सुसंस्कृत व दलित म्हणजे असंस्कृत अशी धारणा ठेवूनच मांडणी केली आहे. म्हणूनच नाटकातील दलित नायक 'अरूण' आपल्या सवर्ण बायकोला ज्योतीला गरोदर असतानाही लाथा घालताना दाखवला आहे. मात्र ज्योती हा सर्व अन्याय निमुटपणे सहन करताना दिसते. म्हणजेच तेंडुलकर समाजाच्या सर्व घटकांचे यथायोग्य चित्रण करत नाहीत. समाजजीवनाचे पुरेसे प्रतिबिंब त्यात उमटलेले नाही. शैक्षणिक प्रगतीने शिक्षणाच्या प्रसाराने दलित तरूण शिक्षण घेवून सुसंस्कृत होत आहे, परावर्तीत होत आहे, या सामाजिक बदलाची नोंद तेंडुलकर घेताना दिसत नाहीत. तेंडुलकर सवर्णीय समाजाकडे सुसंस्कृत व दलिताकडे असंस्कृत, विकृत म्हणून पाहतात म्हणूनच प्रत्येक माणसात असणारा पशू हा केवळ दलितातच असतो असे दाखवतात तर लेबेनान चळवळीच्या चर्चेतून "एकेकाळी ज्यांचा छळ होतो त्यांना मोका मिळाला की दुसऱ्यांना छळण्यात मजा येत असेल. ज्याची पिळवणूक होते तो संधी सापडली की आणखी कुणाची पिळवणूक आंनदानं करीत असेल."[२] असा अरूणच्या वागण्याचा अर्थ लावला जातो. एकंदरीत आंतरजातीय विवाह झाले तर दलित आपल्या पूर्वजावर झालेल्या अत्याचाराचा बदला घेतील हेच नाटककाराला सूचवायचे आहे.

तेंडुलकर सवर्ण समाजाला आंतरजातीय विवाहामुळे होणारा त्रास दाखवून देतात. दलित हे परिवर्तन स्विकारत असले तरी त्यांच्यात सुधारणा होणार नाही ते असंस्कृतच राहणार हे त्या समाजावर ठसवतात व आंतरजातीय विवाहाला विरोध दर्शवितात. समाजाच्या स्थैर्यासाठी, सुखीजीवनासाठी पारंपरिक विवाहपद्धतीचाच अप्रत्यक्षपणे ते पुरस्कार करतात. तेंडूलकरांच्या मनात समाजाशी स्वत:च्या अस्तित्वासाठी लढणाऱ्या या दलित तरूणाबद्दल कळवळा नाही म्हणून ते त्याचे चित्रण क्रुर असे करतात. यामुळे प्रस्थापिताची मते अधिकच प्रस्थापित होण्यास मदत होते. ते दलितांचे चित्रण पूर्वग्रह दूषित दृष्टिकोनातून करतात. असे असले तरी त्या तुलनेत दत्ता भगत,

रामनाथ चव्हाण, संजय पवार यांनी आपल्या नाटकातील सवर्णीय व्यक्तिरेखा विकृत चित्रित केलेल्या नाहीत.

प्रत्येक नाटककार नाटकातील आंतरजातीय विवाहाकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहतो मात्र जातीयता निर्मूलन, माणसातील माणूसपणा जागे करून लोकांच्यात जागृती निर्माण करणे हे ध्येय या दलित नाटकाच्या रचनेमागे असल्याचे जाणवते.

दत्ता भगत 'वाटा पळवाटा' नाटकात तीन पिढ्यांचा संघर्ष चित्रित करतात तसेच दलित सवर्ण संघर्ष व माणसाच्या मनात लपून बसलेली जातीयता याचे चित्रण करतात. हा संघर्ष दाखवताना आंतरजातीय विवाहाचे चित्रण करून जातीयतेच्या पलीकडे माणूसकी जपणारी वैचारिकता ही दाखविली आहे. नाटकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणजेच पहिल्या पिढीचे प्रतिनिधी काका म्हणतात, "आमच्यातली एखादी पोरगी सतीशनं केली असती तर तीनं सुखानं चार घास खाल्ले असते."[३] यातून या आंतरजातीय विवाहाने आपल्या जातीतील मुलीचे नुकसान केल्याचे सुचवून जातात. मात्र हेमाचा स्वभाव पाहून तिला स्विकारतात. हेमालाही या आंतरजातीय विवाहाने मानसिक कुचंबना सहन करावी लागते. दासराव हे हेमा ब्राह्मण म्हणून तिच्या हातचा चहा पितात शिवाय माघारी तिच्या जातीबद्दल संशय व्यक्त करतात. अर्जुनही रागाच्या भरात तिला वाट्टेल ते बोलतो म्हणून समंजस, समजुतदार, प्रेमळ असणारी हेमा म्हणते, "महार म्हटलं तर शिवी ठरते आणि बामण म्हटलं तर? तर काय? तो माझा गौरव होतो?"[४] सतीशने व हेमाने जातीयता मोडण्यासाठी आंतरजातीय विवाह केला मात्र समाजाकडून त्यांना त्रास सहन करावा लागला.

आंतरजातीय विवाह सतीश वैचारिक पातळी वाढवून करतो.मात्र काकाचा साधा व्यवहारी दृष्टिकोन त्याला कळत नाही. शिक्षणाने सतीश पांढरपेशी मध्यमवर्गीय गृहस्थ झाला आहे. म्हणून केवळ तो वांझ विचारच करतो, चळवळीवरती वक्तवे करतो, मात्र स्वत: चळवळीत सहभागी होताना दिसत नाही. अटळ असणारा संघर्ष टाळावा, संघर्ष होवू नये म्हणून प्रयत्न करतो मात्र स्वत: संघर्षात उतरत नाही इतका तो अलिप्त आहे.

दत्ता भगत यांच्या 'वाटा पळवाटा' नाटकाचे सामाजिक मूल्यमापन करताना असे स्पष्ट होते की, नाटकात समाजजीवनाचे पुरेसे प्रतिबिंब उमटले आहे. नाटककाराने समाजाच्या दलित सवर्ण सर्व घटकांचे यथायोग्य चित्रण केले आहे. नाटकात कोठेही काल्पनिकता, अवास्तवता आढळत नाही. बदलणाऱ्या दलित युवकाची मानसिकता यांची नोंद नाटककार घेताना दिसतो. दलित समाजाचे घडणारे परिवर्तन,

चळवळीच्या शक्तीचा सत्तेसाठी होणारा वापर, दलित तरूणाची पांढरपेशी मध्यमवर्गीय तटस्थ भूमिका, समाजात टिकून असणारी जातीयता याचे वास्तव चित्रण भगत करतात. आंतरजातीय विवाहाबद्दलची काकाची भूमिका दत्ता भगत यांनी प्रामाणिकपणे मांडलेली आहे. सामाजिक वास्तव चित्रित करताना कुठेही त्यांनी ब्राह्मण व्यक्तिरेखा विकृत केली नाही शिवाय दलित व्यक्तिरेखा ब्राह्मण व्यक्तिरेखांना स्विकारताना दिसतात. मात्र दासराव गुरूजी हेमाला नाकारताना दिसतात. यावरून दलिताची समाजाबद्दल होणारी व्यापक दृष्टी दाखवून दत्ता भगत यांनी सर्व समाजाची बांधिलकी मान्य केली आहे. तेंडुलकरांप्रमाणे केवळ सवर्ण समाजाची बांधिलकी ते मांडत नाहीत तर सवर्ण व दलित समाज या दोन्हीचे समतोल वास्तव मांडणी दत्ता भगत करतात मात्र ही समतोल दृष्टी दत्ता भगत यांनी हेमा या ब्राह्मण नायिकेचे चित्रण करताना ठेवलेली नाही. हेमा स्थिरस्थावर दलित नायकाबरोबर विवाह करते याचाच अर्थ दलित नायकाचा संपूर्ण सामाजिक व्यवहार आणि तो जगत असलेले तत्त्वज्ञान हेमाला मान्य आहे. दत्ता भगत हेमाच्या प्रगल्भ वैचारिक भूमिकेतील विसंवादाकडे दूर्लक्ष करतात. उदा.सोनल ही दलित नायिका अर्जुनबरोबर आंतरजातीय विवाह करण्यास अनुकूल असताना हेमा त्याला स्विकृती देत नाही. उलट अनुभवाच्या जोरावरती सोनलला आंतरजातीय विवाह करण्यास प्रतिबंध करते. अर्जुन बाबतीत दत्ता भगत यांनी एक विसंवाद अपूर्ण ठेवलेला आहे. हेमाचे सासरे 'काका' यांची धारणा आहे की, हेमा या ब्राम्हण कन्येने आपल्या मूलाबरोबर विवाह केल्याने एका दलित युवतीच्या वाट्याला येणारे सुख हिरावले गेले आहे. जर अर्जुनबरोबर सोनलचा विवाह झाला असता तर कदाचित एक सामाजिक वर्तुळ पूर्ण झाले असते. मात्र सोनलला हेमाने आंतरजातीय विवाहाला प्रतिबंध करणे म्हणजे केवळ दलितातील उच्चपदस्थ आर्थिक स्थैर्य प्राप्त झालेला नायकच निवडण्याची हेमाची मानसिकता शुद्ध, सामाजिक अभिसरणाची नसून स्वार्थी मनोवृत्तीचे बीज त्याच्यामध्ये सूप्त रूपात असल्याचे दिसून येते त्यामुळे सवर्णाची खुजी मानसिकता व दलिताची प्रगल्भ मानसिकता उभी करण्यात दत्ता भगत अपयशी ठरले किंवा त्याविषयावर कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता ते संदिग्धच ठेवले ही संदिग्धता एक प्रश्न बनुन शिल्लक राहते.

मात्र 'कोण म्हणतं टक्का दिला?' या नाटकात संजय पवार यांनी आंतरजातीय विवाहाची मांडणी करताना पौराणिक मिथक कथेचा वापर केला आहे. प्राचीन काळातील शुक्राचार्य, देवयानी व कचऱ्याची ही कथा. देवयानी आसूर कुळातील व कच हा देव कुळातील ही दोघे भिन्न कुळातील असल्याने त्याचा विवाह होवू शकत

नाही. येथे संजय पवार आपल्या कल्पनेने मिथकात बदल करतात व कचला देवयानीकडून विसाव्या शतकास तू दलित कुळात जन्मशील व तूला वाढावे लागेल सवर्ण कुळात असा शाप देते. हा पवार यांनी केलेला कल्पनेचा विस्तार नाटकाला पुढे प्रवाही करणारा ठरतो. मात्र या प्रवेशात 'आसूर कुळ' व 'देव कुळ' या दोन कुळाचाच संबंध प्रामुख्याने ध्यानात घ्यावा लागतो.

विसाव्या शतकाच्या कच 'कचऱ्या' म्हणून जन्माला येतो व समता विनिमय कायदयानुसार सवर्णाच्या घरात राहावयास येतो. येथे काल्पनिकतेचा वापर केल्याने हे नाटक वास्तवापासुन दूर जाताना दिसते. या नाटकाचे सामाजिक मूल्यमापन करताना नाटककाराची दलित तरूणाला सवर्ण कुटूंबात वास्तव्यास ठेवणे ही कल्पना लक्षात घेऊन दोन सामाजिक समूह जे संस्कृतीने, राहणीमानाने, संस्काराने वेग-वेगळे आहेत त्याचे एकत्रीकरण त्यातून निर्माण होणारा कौटुबिंक, सामाजिक, सांस्कृतिक संघर्ष लक्षात घेणे गरजेचे आहे. कचऱ्याचा 'दगड' देव हा सवर्णाच्या घरातील देव्हाऱ्यात चालत नाही तेथे दलित तरूण जावई म्हणून चालणार नाही याची जाणिव कचऱ्याला आहे. म्हणूनच तो सुकन्याला म्हणतो, "रांगडा गडी पहायला, ऐकायला वाचायला बरा....."[५] यातूनच तो सुकन्येच्या आंतरजातीय विवाहाच्या निर्णयावर परत विचार करण्यास भाग पाडतो. मात्र सुकन्या ही "मला जातीची, धर्माची बंधने तोडायचीत."[६] या आपल्या विचारावर ठाम राहते म्हणून हा आंतरजातीय विवाह होताना दिसून येतो.

संजय पवार दलित आणि सवर्ण संस्कृती एका घरात राहताना दाखवतात. तेव्हा कचऱ्या सुदर्शनला हे जाणवून देतो की तो या राष्ट्राचा रहिवासी नाही. तो दलितांना देवळे, पाणवठे खुले करून त्याच्यावर उपकार करत नाही तर तो त्याचा हक्क आहे म्हणूनच त्याची सवर्ण समाजाप्रती तक्रार आहे की, "तुम्ही नुस्तेच बदलतो म्हणता, चुकलोय म्हणतच नाय."[७] आपल्या पुर्वीच्या करणीबद्दल सवर्णाना कसलाच पश्चात्ताप नाही याचे त्याला आश्चर्य वाटते.

'कचऱ्या' हा शापित असल्याने त्याचा पूर्वीचा 'कच' याच्याशी संवाद होत असतो. यातून कचऱ्या हा पौराणिक काळ व आधुनिक काळ यांचा संबंध जोडताना दिसतो. देवयानीच्या शापानें हा राक्षस विसाव्या शतकातल्या देवांच्या दुनियेत घुसवला गेला. कचला देव आणि राक्षस यांच्या कलहापेक्षा हा माणसाचा सहवास कदाचित अधिक सुखद असेल असे वाटत होते मात्र येथिल "माणसं देवाचं नावं घेऊन राक्षसासारखी वागताहेत."[८] हे त्याला दिसून येते. माणूसच माणसाला स्वीकारायला तयार नाही त्याचा देवही स्वीकारायला तयार नाही. धर्माच्या, देवाच्या नावावर माणूस

माणसात फरक करतो आहे व राक्षसासारखा वागतो म्हणून कचचे 'क्रचऱ्या' बनून विसाव्या शतकातील देवांच्या दूनियेत म्हणजेच सवर्णाच्या जगात स्वत:शी संघर्ष चालू आहे. या संघर्षात तो दलित म्हणजेच राक्षस कुळाचा प्रतिनिधी म्हणून वावरताना दिसतो म्हणून तो सुदर्शनबरोबर धर्म, कायदा यावर चर्चा करताना दिसतो. सुदर्शन दलितांना पाणी, देवळं खुली करून नोकऱ्यांत राखीव जागा ठेवून मन मोठं केल्याची ग्वाही देतो. मात्र या धर्मानेच कायदा करून दलिताचे हे हक्क हिरावून घेतले हे धर्मात कायदा घुसता कामा नये असे म्हणणारा सुदर्शन सोईस्कररित्या विसरतो हे कचऱ्या सुदर्शनला जाणवून देतो. सवर्ण समाजातील युवकाची उपकाराची भावना त्यावर हे कचऱ्याकडून केलेले भाष्य पवारांनी योग्य प्रकारे मांडले आहे.

समाजातील पारंपरिक विचारसरणीवर, रूढीवर कचऱ्या बोलताना तो आधुनिक काळातील परिवर्तनशील दलित युवकाचे प्रतिनिधित्व करताना दिसतो. म्हणूनच तो न्युक्लिअर पॉवरच्या चर्चेच्या काळात त्रिशूल हातात घेऊन हिंडणाऱ्या उच्चवर्णियावर बोलतो. न्युक्लिअर वाल्यांनी क्रॉसवरचा आपला हात काढलेला नाही हे मान्य करूनही त्यांनी तो मुठीत बंदही केला नाही हे ठामपणे तो सुदर्शनला सांगू शकतो. यावरून कचऱ्या सद्य सामाजिक स्थितीवर बोलताना दिसतो.

संजय पवार यांनी पौराणिक मिथक कथेचा नाटकाच्या प्रारंभी आधार घेतला असला तरी विसाव्या शतकातील सामाजिक घडामोडींचा आपल्या नाटकात अंतर्भाव करून त्यावर पारंपरिक व आधुनिक विचार सरणी नुसार चर्चा घडवून आणली आहे.

सामाजिक समतेचा भाग म्हणून कचऱ्या या दलित युवकाला आराध्येच्या घरात घुसविणे हा भाग काल्पनिक असला तरी त्यामागे नाटककाराची दलित व सवर्ण संस्कृती एका घरात वाढविण्याची कल्पना नाविन्यपूर्ण आहे. मात्र सद्य सामाजिक परिस्थितीत तसे घडत नाही. ही नाटकाची सामाजिक वास्तवाबाबत मर्यादा आहे. ही मर्यादा मान्य करूनही संजय पवारांनी नाटकामध्ये दलित सवर्ण वैचारिक संघर्ष घडवून मानसाच्या मनातील जातीयतेवर प्रकाश टाकला आहे हे मान्य करावे लागते.

नाटक काल्पनिक घटनेवरती आधारित असले तरी वर्तमानातील सामाजिक मानसिकता परिणामकारकपणे मांडण्यात यशस्वी झाले आहे. आंतरजातीय विवाहाची समस्या मांडताना नाटककार जातीयता प्रकाशात आणून, पुराणकालातील राक्षस कुळाशी संबंध जोडून पुराणकाळापासून ही समस्या प्रचलित असल्याचे अप्रत्यक्षरित्या स्पष्ट करतो. कच हा कचऱ्या बनल्यानेच राक्षसातला अमानवीपणा आणि देवत्वातला फोलपणा तो

स्पष्टपणे सांगू शकला म्हणून कचऱ्या केवळ 'माणूस' बनून देव दानव जन्माचं शापित कडं भेदून सुकन्याशी आंतरजातीय विवाह करून फक्त माणूस जन्माला घालणार आहे. जो देवतांच्या नावावर राक्षस होणार नाही की राक्षसांचा देव होऊन मिरवणार नाही. ज्याच्यावर जातीधर्माची बंधने नसतील केवळ माणूसकीचे संस्कार असतील ज्याला अमरत्वापेक्षा क्षणभंगुराचं महत्त्व कळून तो प्रत्येक क्षण जिवंत करील. देवयानीच्या शापाने कच 'कचऱ्या' म्हणून माणसाचे जीवन जगू शकला व एक जाती धर्माविरहित केवळ माणूसपण जपणारा, जगणारा माणूस निर्माण करण्याचा संकल्प करू शकला. यातूनच त्याला जगण्याचा एवढा सुंदर अर्थ कळला आहे. हे संजय पवार यांचे माणूसपणाचे स्वप्न प्रेक्षकांपुढे उभे करताना त्यातून जनमानसावर परिणाम घडवून आणून समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न येथे दिसून येतो. तेथे नाटककाराची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते.

नाटकासाठी वापरलेल्या पौंराणिक मिथककथेचा काल्पनिक विस्तार व सामाजिक समतेचा भाग म्हणून दलितास सवर्णाच्या घरात ठेवणे या दोन काल्पनिक घटना आधार माणून नाटककाराने केलेले सामाजिक चित्रण वास्तव आहे. दलित व सवर्ण जीवनाचे विचार, जीवनपद्धती याचे पुरते प्रतिबिंब नाटकात उमटले आहे. न्युक्लिअर पॉवर, आरक्षण, पाणवठे, मंदिरे दलितांसाठी खुली करणे अशा सामाजिक बदलांची नोंद व त्याचे पडसाद यांची नोंद नाटकात नाटककाराने घेतलेली आहे. म्हणजेच नाटकामध्ये समाजाच्या स्थैर्यासाठी सुखी जीवनासाठी आवश्यक असणारी जातिविरहित मानसिकतेची गरज मांडलेली आहे.

या नाटकात मिथकाच्या आधारे वर्तमानकालीन सामाजिक समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयोग म्हणावा तितका परिणामकारकपणे होवू शकला नाही. मिथकाच्या यशस्वीतेसाठी काल्पनिक अशा शासनाच्या आरक्षणविषयक आदेशाची केलेली मांडणी वस्तुस्थितीशी सुसंगत नाही. त्यामुळे हे नाटक सामाजिक वास्तवाऐवजी कल्पनारंजकच परिणाम ठेवून जाते. मिथकाकडे पाहण्याचा दुसराही दृष्टिकोन जाणवतो. तो म्हणजे संजय पवार या समस्येचा मागोवा घेत पुराण काळातील कथेपर्यंत पोहचतात व या सामाजिक समस्येचा वेध मुळापासून घेण्याचा प्रयत्न करतात. आंतरजातीय विवाहाची समस्या मांडताना संजय पवार यांनी माणसाच्या मनात असणाऱ्या जातीयतेचा शोध घेतला आहेच, शिवाय सामाजिक परिवर्तनामुळे होणारी पारंपरिक, पुराणमूल्यांची पडझड रेखाटली आहे. तरीही असे म्हणता येईल की, सामाजिक समस्येचे

चित्रण करताना नाटककाराने घेतलेला मिथकाचाआधार, त्याचे प्राचीनत्व सिद्ध करते. मात्र मिथकाचा काल्पनिक विस्तार वास्तवापासून नाटकाला दूर नेतो व आवश्यक तो परिणाम नाटकामुळे घडत नाही.

'बामनवाडा' या रामनाथ चव्हाण यांच्या नाटकात आंतरजातीय विवाहाची सामाजिक समस्या मांडलेली आहे. त्याबरोबरच एका दलित युवकाची आपल्या समाजापासून दूर जाण्याची व उच्चवर्णीय होण्याची मानसिकता चव्हाणांनी अचूक टिपली आहे.

'बामनवाडा' हे नाटक सामाजिक वास्तवावर आधारित आहे. दलित तरूण उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर नोकरीस लागल्यानंतर त्याच्याकडे आर्थिक स्थैर्य निर्माण झाल्यावर ते आपल्या दलित, दरिद्री, अशिक्षित समाजापासून कसे दूर जातात व आपली जात लपवून ठेवण्याचा कसा प्रयत्न करतात या सामाजिक वास्तवावर हे नाटक आधारीत आहे.

आपली जात पुसून टाकण्यासाठी आंतरजातीय विवाह करणारा नायक भालचंद्र साठे जातीयतेचा कोंडवाडा फोडण्यासाठी म्हणून दलित वस्ती सोडून 'बामनवाडा' आपलासा करतो. व स्वत:ला सुशिक्षित संस्कारीत ब्राह्मण समजू लागतो. मात्र बामनवाड्यातील ब्राह्मणमात्र त्याला दलितच समजतात. म्हणजेच जातीनिर्मुलनाचा मार्ग म्हणून आंतरजातीय विवाहाकडे पाहिले जात असले तरी एक जात सोडून दुसरी जात स्वीकारण्याचा हा एक मार्ग म्हणूनच दलित युवक याकडे पाहताना दिसतो. म्हणूनच साठे म्हणतात, "मी माझी जात सोडायला वाड्यात आलो पण माझ्यासकट मलाच या वाड्यानं सोडून दिलं."[९] यावरून पारंपरिक जातीव्यवस्था आणि तिचा चिवटपणा किती खोलवर रूतून बसलेला आहे याचे प्रत्यंतर उपरोक्त संवादातून प्रत्ययास येते. जातीअंताचा एक पर्याय म्हणून आंतरजातीय विवाहाच्या समस्येची मांडणी होत असली तरी जातीअंताची फलश्रूती करण्यासाठी आंतरजातीय विवाहातून प्रत्ययास येवू शकत नाही. प्रत्येक जातीय समुह आपले जातीचे वर्तुळ अधिक जखडबंद करण्यात अग्रेसर असल्याचे या नाटकातून अनुभवास येते. उच्चजातीचा दर्जा मिळवण्यासाठी दलित नायक कसा प्रयत्नशील असतो याचे वास्तव रेखाटन रामनाथ चव्हाण यांनी भालचंद्र साठे या वरिष्ठ पदावरील कार्यरत असणाऱ्या दलित नायकाच्या व्यक्तिरेखेतून दृष्टिपदास आणले आहे. आपले दलितपण त्यागले जावे हा हेतू या व्यक्तिरेखेच्या मानसिकतेत स्थलांतरित करण्यात रामनाथ चव्हाण यशस्वी झाले आहेत. परंतु दलित नायकाची ही कृती 'दलित ब्राह्मण' या प्रवृत्तीचे निदर्शनही नाटककार करतात. आपल्या आईला व भावाला

आपल्याबरोबर वाड्यात ठेवण्यास हा दलित अधिकारी तयार नाही. मात्र या दलित नायकाची ब्राह्मणकुलीन पत्नी पासून हा व्यवहार लपवून ठेवतो. या ब्राम्हण नायिकेची मानसिकता सर्व काही स्वीकारणारी आहे. तसे निसंदिग्ध चित्रण नाटकाच्या शेवटी येते. असा हा एकूण नाटकात घडलेला आंतरजातीय विवाहाचा प्रसंग जातीअंतापेक्षा पुन्हा एका नव्या जातीला जन्मास घालणारा आहे असे अनुभवास येते. त्यामुळे नाटकाचा शेवट करताना आपणाला जात विचारणार नाही अशा नव्या वाड्याच्या शोधात निघालेला नायक नायिकेचा प्रवास प्रश्नार्थक ठरून नाटक समाप्त होते. या संदर्भात नाटककारांनी मांडलेले बारकावे विचारात घेण्यासारखे आहेत.

'बामनवाडा' नाटकात नाटककार समाजाची असणारी विशिष्ट रचना मोडीत काढण्याचा प्रयत्न करताना दिसतो. परंपरागत सामाजिक स्तरानुसार गट करून राहणारी माणसात,एक कनिष्ठ स्तरातील युवक वरिष्ठ स्तरात येणे हे सामाजिक परिवर्तन होते. त्यामुळे नाटकात सामाजिक, कौटुंबिक व वैचारिक संघर्ष घडून येतो व माणसाच्या मनात लपून बसलेली जातीयता समोर येते.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या शशीचे वडील तात्या समाजसुधारक आहेत. ते या विवाहाला पाठिंबा देताना म्हणतात, "खरं म्हणजे आम्ही तुमचे अपराधीच आहोत. हजारो वर्षे आम्ही तुम्हाला छळत आलोय. त्या अपराधाचं प्रायश्चित्त म्हणून हे करतो बाकी दलित काय आणि ब्राम्हण काय शेवटी आपण सगळी माणसचं."[१०] यावरूनच या विवाहाला संमती देवून ते आपल्या पूर्वीच्या कर्माचे प्रायश्चित्त करत आहेत. मात्र घरी माईचे विचार ते बदलू शकत नाहीत. वाड्याबाहेर स्वत:ला समाजसुधारक, कार्यकर्ते म्हणविणारे तात्या माईपुढे हातबल होतात. माईची पारंपारिक विचारसरणी ते बदलू शकत नाहीत म्हणून स्वत: शशीसाठी दलित समाजात राहण्यासाठी खोली शोधण्यास सांगतात. समाजात अशा प्रकारच्या व्यक्ती आहेत जे समाजापुढे समाज सुधारकाचे बुरखे घालून जगतात. जे पुरोगामी असल्याचे ढोंग करतात मात्र पारंपरिक विचारच जगतात. म्हणूनच तात्या भालचंद्र साठेच्या आईच्या प्रेताला खांदा देण्यास नकार देतात. समाजसुधारक लोकांचा ढोंगीपणा नाटककाराने समोर आणला आहे. समाजात वावरणाऱ्या अशा अनेक व्यक्तिरेखा आढळतात याचे वास्तव चित्रण नाटककार करताना दिसतो.

पारंपरिक विचारसरणी जोपासणारा, जगणारा एक गट समाजात कार्यरत आहे याचे चित्रण नाटककाराने माई, राधाकाकू, पाटील यासारख्या व्यक्तिरेखा चित्रित करून केल्या आहेत. ब्राह्मणवाड्यात रहायला आलेले साठे, साठेची आई माईला सहन

होत नाही. ती स्पष्टपणे म्हणते, "ब्राह्मणवाड्याचा महारवाडा करायचा नाही मला..."[११] यातून त्याचा सनातनीपणा दिसून येतो. येथे वाडा हा समाजातील विशिष्ट जातीशी निगडीत असून ते कोंडवाडेच आहेत. जेथे एकाच जातीच्या वाड्यातील व्यक्ती दुसऱ्या जातीच्या वाड्यात जावू शकत नाही. जातीने मिळालेल्या वाड्यातच त्यांना जन्मभर जगावे लागते हे सामाजिक वास्तव चव्हाण येथे व्यक्त करतात. जर आंतरजातीय विवाह झाले तरी हे वाडे मोडतीलच याची शक्यता वर्तवता येत नाही हे नाटककार सूचवतात.

समाजात दलित सुशिक्षित होत आहेत. नोकरी मिळवून आर्थिक स्थैर्य मिळवत आहेत. या सामाजिक वास्तवाचे चित्रण नाटकात येत असतानाच सवर्ण समाजात त्याचे पडसाद कसे उमटतात हेही नाटककार मांडतो. साठेचा मेहुणा सुदर्शन विचाराने परिपक्व, सामाजिक भान असणारी व्यक्ती आहे, मात्र आपण ब्राह्मण असून आपल्याला नोकरी नाही याचे शल्य त्याच्या मनात आहे. याबाबत तो द्वेषाने म्हणतो, "साला ब्राम्हण असून बेकार म्हणजे काय! आणि हा भाल्या क्लासवन ऑफिसर वारे न्याय! म्हणे एम.ए.एल्.एल्.बी. रिझर्व कोटा. (हसतो)."[१२] हे सामाजिक वास्तव नाटककार मांडतो. यातून सवर्ण लोकांचा दलितांच्या वाढत्या सामाजिक दर्जाकडे पाहण्याचा दृष्टिकोन येथे स्पष्ट होतो.

शशी आणि भालचंद्र साठे यांच्या आंतरजातीय विवाहाची मांडणी करून चव्हाण यांनी अनेक सामाजिक समस्या मांडलेल्या आहेत. जातीयतेचे वाडे नाकारून दोघांनी आंतरजातीय विवाह केला असला तरी साठे मात्र दलित समाज सोडून सवर्ण बनण्यासाठी धडपडताना दिसतो. शशी सर्वार्थाने साठे, साठेचा भाऊ भिवा, आई यांना स्वीकारायला तयार आहे. मात्र साठेला आपल्या मुलाने आपल्या समाजात जन्म घेवू नये असे वाटते. इतक्या टोकाला जावून साठे आपल्या समाजाबद्दल नकाराची भूमिका घेतो. असे असले तरी क्लासवन अधिकारी असूनही बामणवाडा त्याला स्वीकारत नाही. त्याची ओळख दलित म्हणूनच करून दिली जाते. अशोक मोरे सामाजिक वास्तवाची जाणिव साठेना करून देत असला तरी साठे स्वत:च्या सवर्ण बनण्याच्या ओढीतून बाहेर येऊ शकत नाही. त्यासाठी तो आपल्या गरीब भावाला भिवाला ओळखही दाखवत नाही. उच्चवर्णीय होण्यासाठी आपल्या नात्यापासूनही तो दूर जाण्यास तयार आहे. मात्र आई बामणवाड्यात रहायला आल्यावर तिच्याप्रती शेजाऱ्याचे वागणे बघून अस्वस्थ होतो. तिच्या जखमी होण्याने, आजारी पडण्याने चिंतित होतो. बामणवाड्यातच लहान मुलाने दलित आईला दगड मारणे हे बामणवाडा दलिताचा करत असलेल्या द्वेषाचेच संकेत

आहेत.मात्र आईच्या मृत्यूने साठे भानावर येतो सवर्ण बनण्याचा त्याचा अट्टाहास मोडून पडतो. आईच्या प्रेताला खांदा देण्यासही तात्या तयार नसतात. आम्ही प्रेतयात्रेला सामील होवू. खांदा देण्यास मात्र तुमचेच लोक हवेत, म्हणून तात्या अशोक मोरेला निरोप देण्यास निघून जातात. आंतरजातीय विवाह केला म्हणून सत्कार करण्यासाठी निमंत्रित करण्यास आलेले पाटील वाड्यातून काढता पाय घेतात. तेव्हा आपल्या दलित समाजापासून दूरावलेला साठे एकटा पडतो. हे भयाण वास्तव नाटककार चित्रित करतात की दलित तरूण सवर्ण होण्यासाठी आपल्या समाजाला नाकारतात मात्र त्याला सवर्ण समाज स्वीकारत नाही आणि दलित समाजही आपले म्हणत नाही. अशा वेळी नाटककार आपल्या विचारांची मांडणी करण्यास शशीसारख्या व्यक्तिरेखेचा वापर करतो. शशीच्या व्यक्तिरेखेमार्फतच नाटककार आपले विचार समाजापर्यंत पोहचवतात. शशी साठेला माणूस म्हणून स्वीकारते. साठेबरोबरच त्याचे कुटूंब, त्याचे दलितत्त्व, त्याचा समाज स्विकारण्याचे धैर्य ती दाखवते. आईच्या मृत्यूनंतर तीच्या प्रेताला खांदा देण्यास कोणी येणार नाही याची जाणीव शशीला आहे म्हणूनच ती साठेला धीर देते. आपण दोघे तिची उत्तरक्रिया करू म्हणून सांगते. कारण तिला कल्पना आहे की जाती, जमातीच्या कोंडवाड्यात स्वत:ला कोंडून घेतलेली माणसांच्या रूपातील जनावरं आहेत ही माणसे.इथे माणसाच्या जातीचे वाडे पोसले जातात. इथे प्रत्येकाचे अस्तित्व जन्मानं आणि कर्मानं वेगळं आहे. इथला हा जातीचा वाडा दूसऱ्या वाड्याला कधीच आपला म्हणत नाही. कदाचित तिच्या प्रेतालासुद्धा या वाड्यातली माणसं येणार नाहीत म्हणूनही माणस जातीजमातीचे कोंडवाडे तोडून, फोडून उदध्वस्त करून आपल्याला निर्माण करायची आहेत. म्हणून साठेनां "कृपया माझ्याकडं ब्राह्मणकन्या म्हणून पाहू नका... एक माणूस नावाची स्त्री. तुमची पत्नी म्हणून पहा."[१३] अशी विनंती करते. किमान आपण दोघतरी एकमेकांना माणूस म्हणून स्वीकारू आणि आपणच आपला नवा समाज निर्माण करू.. जिथे जाती पोटजातीच्या भिंती नसलेले वाडे असतील आणि त्यात राहतील फक्त माणूस नावाच्या स्त्रिया आणि पुरूष नावाची माणसं हा शशीचा व्यापक दृष्टिकोन रामनाथ चव्हाण यांची विचारसरणीच स्पष्ट करतो.

सामाजिक मूल्यमापनाच्या दृष्टीने विचार करता 'बामणवाडा' नाटकात समाजाच्या सर्व घटकांचे यथायोग्य चित्रण झालेले आहे. नाटकातील कोणतेच घटनाप्रसंग वास्तवाला सोडून नाहीत. कुठेही काल्पनिक चित्रण नाही. नाटककार समाजाकडे समतोल दृष्टीने पाहताना दिसतो.दलित आणि सवर्ण यांचा वैचारिक, भावनिक संघर्ष दाखवताना कोणत्याच व्यक्तिरेखेला ते बांधून ठेवताना दिसत नाहीत.

सर्व पात्रे आपल्या सरळ स्वाभाविक, सामाजिक स्वभावानुसार वागताना दिसतात. नाटककाराने समाजप्रबोधन करताना परिवर्तनातून विकृत होणारा, समाजापासून तुटत जाणारा युवक चित्रित करून अजूनही समाजातील माणसाच्या मनातील जातीयता नष्ट झाली नाही हे वास्तव चित्रित केले आहे. समाजाच्या स्थैर्यासाठी, सूखीजीवनासाठी माणसाने माणसाकडे जातीयता विसरून माणूस म्हणून पाहणे गरजेचे आहे. हे नाटककार शशीच्या माध्यमातून मांडण्यात यशस्वी झाले आहेत. आंतरजातीय विवाहाच्या मार्गाने जाती विरहित माणूस निर्माण करता येईल अशी आशा चव्हाणांना आहे.

नाटककाराला दलित समाजाबद्दल कळवळा आहे त्यामुळे त्या समाजातील दलितांची भावनिक कुचंबना, कौटुंबिक कुचंबना दाखवताना नाटककार दिसतो. नाटकाचा जनमानसावर अपेक्षित परिणाम होतो. नाटककार प्रामाणिकपणे सामाजिक समस्येची मांडणी करताना दिसतो म्हणून हे नाटक वास्तव, सामाजिक समस्या चित्रित करण्यात यशस्वी झाले आहे.

चारही नाटकांचा साकल्याने विचार करता असे म्हणता येईल की प्रत्येक नाटकामध्ये आंतरजातीय विवाहाची समस्या वेगवेगळ्या दृष्टीकोनातून मांडली गेली आहे. 'कन्यादान' नाटकात तेंडूलकरांनी प्रतिलोम विवाहाचे चित्रण करून सवर्ण व दलित संस्कृती यातील फरक दाखवून या दोन संस्कृती एकत्र येणार नाहीत अशी रचना केली आहे तर दत्ता भगत, संजय पवार व रामनाथ चव्हाण यांनी हा सांस्कृतिक फरक दाखवूनही समाज परिवर्तनशील आहे हे मानून एकसंघ, समताधिष्ठित समाजाचे स्वप्न साकार करण्याचा मार्ग दाखवून नाटकाद्वारे जनमानसांचे प्रबोधन केले आहे.

तेंडुलकरांची 'कन्यादान' नाटकाद्वारे दिसणारी सामाजिक बांधिलकी ही केवळ प्रस्थापित समाजाशी निगडीत आहे. समाजजीवनाचे पुरेसे, सर्व घटकाचे यथायोग्य चित्रण यात दिसून येत नाही. तर इतर तीन नाटकांत समाजातील प्रवृत्तीचे वास्तव चित्रण करून सवर्ण व दलित असा भेद न करता सर्व समाजाची बांधिलकी नाटककार स्वीकारताना दिसतात. आंतरजातीय विवाहाची समस्या मांडताना 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला', 'बामणवाडा' या नाटकात दोन सामाजिक स्तरातील वैचारिक संघर्ष दाखवताना सद्य सामाजिक घडामोडीवर नाटककार चर्चा घडवून आणतात दोन्ही स्तरातील विचारसरणी स्पष्टपणे रूपात प्रेक्षकांपुढे मांडतात. त्यामुळे नाटकाची रचना एकांगी होत नाही.

'कन्यादान' नाटकातून मिळणारा संदेश हा आंतरजातीय विवाह करू नये असा मिळतो तर इतर नाटकात प्रतिलोम विवाहाचे चित्रण येवूनही या नाटकाची रचना

परिपूर्ण आहे. यावरून जातीनिर्मूलन करून समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संदेश मिळतो.

आंतरजातीय विवाहाची समस्या या सामाजिक समस्येच्या चित्रणाबाबत उपरोक्त चार नाटकाचा विचार करता असे म्हणता येईल की, 'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला', 'बामनवाडा' या नाटकात ही समस्या वेगवेगळ्या दृष्टीने मांडलेली आहे. 'कन्यादान' नाटकाद्वारे प्रस्तापित समाजाची धारणा टिकविण्याचे काम केले गेले. 'वाटा पळवाटा' मध्ये जातीय संघर्षाबरोबर सवर्ण व दलित संस्कृती वैचारिकदृष्ट्या एकत्र नांदताना दाखविल्या गेल्या. तर 'कोण म्हणतं टक्का दिला?' मध्ये या समस्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न पण आधुनिक काळात समताधिष्ठित, एकसंघ समाजाचे स्वप्न साकार करण्याचा मार्ग म्हणून याकडे पाहिले गेले. तर 'बामनवाडा' मध्ये आंतरजातीय विवाहाद्वारे दलित युवकाची विकृत मानसिकता दाखविली आहे. एक सामाजिक समस्या म्हणून 'बामनवाडा' मध्ये या आंतरजातीय विवाहाची समस्या प्रभावीपणे चित्रित झाली आहे. कारण 'कन्यादान'प्रमाणे या नाटकात एकांगी विचार नाही तर आधुनिक वैचारिकतेवर याचा भर असून परंपरावादी विचारसरणी व पुरोगामी विचारसरणी याचे समतोल, वास्तव प्रतिबिंब यात उमटले आहे. 'वाटा पळवाटा' मध्ये जातीय संघर्षाला महत्त्व देवून दलित चळवळीची स्थिती जास्त प्रभावीपणे चित्रित झाली आहे. 'वाटा पळवाटा' नाटकाचा आंतरजातीय विवाह हा एक घटक आहे. त्यातून माणसाची जातीय मानसिकता उघड करून दाखविली आहे. 'कोण म्हणतं टक्का दिला' नाटक मिथकावर आधारित नाटक आहे म्हणून या समस्येचे प्राचीनत्त्व स्पष्ट होते मात्र नाटकातील समता विनिमय केंद्र, सामाजिक ऐक्यासाठी केलेला कायदा या घटना काल्पनिक आहेत. त्यामुळे नाटकातील सामाजिक वास्तवाला बाधा येते. समताधिष्ठित एकसंघ समाजाची आशा जरी नाटककार वर्तवत असला तरी नाटकातील काल्पनिक नियम, कायद्यामुळे नाटकाला मर्यादा येते.

'बामनवाडा' नाटकात रामनाथ चव्हाण यांनी कुठेही काल्पनिक घटनांचा आधार घेतला नाही. संपूर्ण सामाजिक वास्तवावर हे नाटक घेतलेले आहे. या नाटकाबाबत प्रदक्षिणा खंड दूसरा मध्ये मत मांडले आहे की, "संजय पवार यांचे 'कोण म्हणतं टक्का दिला?' हे नाटक दलित दलितेत्तरांच्या प्रश्नावर भाष्य करते. तर रामनाथ चव्हाण लिखित 'बामनवाडा' नाटक दलितांना आशावादाचे दर्शन घडविते. दत्ता भगत यांचे 'वाटा पळवाटा' आणि टेक्सास गायकवाड यांचे 'मन्वंतर' या नाटकातूनही असाच आशावाद फुललेला दिसतो."[१४] म्हणजेच वरील नाटकात सामाजिक समस्येची मांडणी

करून सद्य परिस्थितीतून बाहेर पडण्याचा आशावाद जोपासलेला दिसून येतो. आंतरजातीय विवाहाच्या समस्येबाबत विचार करता चारही नाटकातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या दांपत्यांची भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे.

'कन्यादान' मधील ज्योती व अरूण हे आंतरजातीय विवाह का करतात याचे ठाम कारण मिळत नाही. केवळ नाथला आंतरजातीय विवाहाच्या मार्गाने एक सामाजिक प्रयोग करायचा होता या अर्थाने एक वैचारिक भूमिका घेवून वाटचाल करताहेत. मात्र नाटकाच्या उत्तरार्धात ही भूमिका नाथ स्वत:च नाकारतात व त्यांची अंतिम मनोभूमिका सामाजिक व सांस्कृतिक अंतर कमी करण्यासाठी आंतरजातीय विवाह पूरक ठरत नाहीत अशी होते ही विरोधी भूमिका उच्चकुलीनत्व नाथाची आहे. म्हणजेच आपल्या मुलीला आंतरजातीय विवाहाची संमती देणाऱ्या बापाची मनोभूमिका मात्र हा प्रयोग विवाह करणाऱ्या दांपत्यांना सौहार्दपूर्ण स्वीकारायची मनोभूमिका तयार झालेली नाही. दोन तरूण मनाला एकत्र येण्याची संधी मिळते किंवा संधी दिली जाते म्हणून अरूण व ज्योती एकत्र येतात. जाणीवपूर्वक या दांपत्यांकडून या आंतरजातीय विवाहाची कृती घडलेली आहे असे या नाटकात प्रत्ययास येत नाही. तर 'वाटा पळवाटा' मधील हेमा व सतीश प्रेमसूलभ भावनेतून आंतरजातीय विवाह करताना दिसतात. 'कोण म्हणतं टक्का दिला' मधील सुकन्या कचऱ्याचा व 'वामनवाडा' मध्ये शशी व भालचंद्र साठेचा विवाह हा प्रेमविवाहातून घडून आलेला आंतरजातीय विवाह आहे. आंतरजातीय विवाहाचा विचार करता जातीअंताचा एक मार्ग म्हणून वैचारिक दृष्टीने विवाह होताना दिसत नाही. आंतरजातीय विवाहाची सामाजिक समस्या मांडताना नाटककार वास्तवातील एक वैचारिक सत्य मांडतात. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोणापेक्षा भावनिक प्रेमाला महत्त्व देतात. म्हणून नाटकामध्ये प्रेमभावनेतून, प्रेमविवाहातून आंतरजातीय विवाह घडून येताना दिसतात.

## २. वाङ्मयीन मूल्यमापन :

कोणताही कलावंत आपल्या कलेतून मानवी भाव भावनांचे चित्रण करत असतो. असे असले तरी वाङ्मयीन निकष वापरून कलासापेक्ष दृष्टीने जेव्हा कलाकृतीचे मूल्यमापन केले जाते तेव्हा साहित्यकृतीचे वाङ्मयीन मूल्य समोर येते. नाटक वाङ्मय प्रकारात नाटकाचे घटक, कथानक, व्यक्तिचित्रण, संवाद याची मांडणी कशा प्रकारे केली आहे. यावरून त्या नाटककाराच्या कलाकृतीचे मूल्यमापन केले जाते.

'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?', व 'वामनवाडा' या चार नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना नाटकाचे घटक कथानक,

घटनाप्रसंग, संघर्ष, व्यक्तिरेखा, संवाद व भाषा या घटकाच्या अनुशंगाने पुर्वीच्या प्रकरणात करण्यात आले आहेच. या चार नाटकातील आंतरजातीय विवाहाची समस्या नाटककारांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडलेली दिसते.

प्रत्येक नाटकाचे कथानक आंतरजातीय विवाहाच्या समस्येशिवाय आणखी एक वेगळी सामाजिक समस्या मांडताना दिसते. उदा.'कन्यादान' नाटकात तेंडुलकर मानवाच्या मनातील पशूत्व दाखवण्याचा प्रयत्न करतात. तर लेबेनान चळवळीचा संबंध लावून दलित युवकाची सूड घेण्याची भावना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. 'वाटा पळवाटा' नाटकात दलित चळवळीची पडझड दर्शविताना दलित सामर्थ्याचा सत्तेसाठी होणारा दूरूपयोग स्पष्ट करतात. 'कोण म्हणतं टक्का दिला?' नाटकाच्या माध्यमातून संजय पवार पौराणिक मिथक व आधुनिक सामाजिक संदर्भ यांचा सहसंबंध लावण्याचा प्रयत्न करतात. 'वामनवाडा' मध्ये रामनाथ चव्हाण दलित युवकाची बदलती मानसिकता स्पष्ट करतात. या सर्व कथानकात आंतरजातीय विवाहाची घटना ही एक घटक आहे.

डॉ.मु.श्री.कानडे यांनी 'नाट्यशोध' या ग्रंथात नाटकाच्या कथानकाबद्दल भूमिका मांडली आहे. त्याच्या मते, "कथानकाच्या बांधणीबद्दलही टिकाकार काही नियमावली तयार करतात, परंतु प्रसंग, व्यक्तिरेखा व संवाद यात यश मिळणाऱ्या नाटककाराच्या कथानकातील दोष सहज दृष्टीआड होतात."[१५] या मतानुसार मु.श्री कानडे नाटकाच्या वाङ्मयीन चिकित्सेमध्ये कथानकापेक्षा नाटकातील घटना प्रसंग, व्यक्तिरेखा व संवाद यांना महत्त्व देतात. असे असले तरी नाटक हे समाजाभिमुख असल्याने समाजातील समस्याचे चित्रण नाटकातून होते, त्यामुळे नाटकातील कथाबीजाला, कथानकाला महत्त्व प्राप्त होते. म्हणून कथानकाच्या रचनेच्या दृष्टीने विचार करता 'कन्यादान' नाटक सरस ठरते. आंतरजातीय विवाहाच्या विषयाभोवती मांडणी करताना नाटककाराने घटना प्रसंगाची, अंक प्रवेशाची अशी मांडणी केली आहे. ज्याने नाटकातील समस्येचे रूप समोर येत राहते व या विवाहाने निर्माण झालेले ताण-तणाव वाढताना दिसतात. त्या मानाने 'वाटा पळवाटा' नाटक चळवळ व संघर्षाला महत्त्व देताना दिसते तर 'कोण म्हणतं टक्का दिला?' नाटक प्रयोगावर भर देताना दिसते तर 'वामनवाडा' नाटकाची रचना भावनिकतेला महत्त्व देताना दिसते.

नाटकाच्या कथानकाची रचना करण्यासाठी नाटककार पात्रांची म्हणजेच व्यक्तिरेखांची निर्मिती करतो. व्यक्तिचे मन, स्वभाव, अंतरंग बाह्यरूप यांच्या एकत्रित शब्दरूप अविष्कार म्हणजे व्यक्तिरेखा. नाटकातील व्यक्तिरेखाच्या अनुषंगाने विचार करता 'कन्यादान' मधील नाथ 'कोण म्हणतं टक्का दिला?' मध्ये कमलाकर आराध्ये,

'बामनवाडा' मधील तात्या 'वाटा पळवाटा' मधील दासराव या व्यक्तिरेखा परिवर्तनवादी आहेत. कमलाकर आराध्ये पूर्णार्थाने सुधारणावादी विचाराचे आहेत. मात्र बाकी व्यक्तिरेखा जातीय मानसिकता जोपासणाऱ्या आहेत. याशिवाय वरील नाटकाच्या अनुक्रमे नाटकात येणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा सेवा, विमल, माई या सनातनी परंपरावादी विचारच जपताना दिसतात. हिंदू धर्मसंस्कृतीत वाढलेली स्त्रीमानसिकता परिवर्तन स्विकारताना दिसत नाही. नव्या पिढीचे युवक चित्रित करताना 'कन्यादान' मध्ये तेंडूलकरांनी जयप्रकाश हा सवर्ण समाजाचा प्रतिनिधी व अरूण हा दलित विकृत युवक चित्रित केला आहे. 'कोण म्हणतं टक्का दिला?' मध्ये सुदर्शन व कचऱ्या या दोन व्यक्तिरेखेतून सवर्ण व दलित यांच्यात वैचारिक संघर्ष घडवून आणला आहे. 'बामणवाडा' मध्ये भालचंद्र साठे, अशोक मोरे व श्रीकांत अशा व्यक्तिरेखेतून वैचारिक संघर्ष दाखविला आहे. 'वाटा पळवाटा' मध्ये काका व दासराव हे जातीयतेवर चर्चा करताना दिसतात. प्रत्येक नाटककाराने व्यक्तिरेखा चित्रण करताना त्या त्या संस्कृतीचा त्या व्यक्तिरेखांवर संस्कार करून घडविलेल्या दिसतात.

'कन्यादान' नाटकातील व्यक्तिरेखा साचेबंद पद्धतीने ठराविक परिणाम घडविण्यासाठी नाटककाराने जाणून बुजून घडविलेल्या दिसतात. नाथ देवळालीकर, सेवा, जयप्रकाश ही सर्व सुसंस्कृत सवर्ण, पांढरपेशी समाजातील अशा व्यक्तिरेखा, ज्याच्यात कोणतेच दुर्गूण नाहीत तर अरूण आठवले हा विकृत, स्वार्थी, सूडाने पेटलेला, आपल्या पूर्वजांच्या दू:खाचा सुड घेणारा असा आहे. तेंडुलकरांनी नाटकातील सर्व व्यक्तिरेखापैकी अरूणची व्यक्तिरेखा भडक केली आहे त्यामानाने इतर व्यक्तिरेखा सोशिक व समजंस आहेत. मात्र हे व्यक्तिरेखा चित्रण एकांगी वाटते. मानवातील पशूत्वाबद्दल, हिंस्त्रतेबद्दल चित्रण करताना नाटककार केवळ अरूण मधीलच पशूत्व प्रभावीपणे चित्रित करतात.

'वाटा पळवाटा' मधील काका, दासराव, हेमा, सतीश, अरूण, सोनल या व्यक्तिरेखा चित्रित करताना दत्ता भगत सवर्ण व दलित व्यक्तिरेखांमधील समतोल साधताना दिसतात. दासरावांची ब्राम्हणग्रस्त व्यक्तिरेखा चित्रित करताना काकाचीही आपल्या समाजाप्रतीची बांधिलकी ते तितक्याच सामर्थ्याने रेखाटतात तसेच अर्जुनची दलित समाज बांधिलकी ही प्रभावीपणे मांडतात. पुरग्रस्ताच्या घरात पुरग्रस्तासहित आपले दलित समाजातील कुटूंब स्थिरावू पाहणारा अर्जुन ही व्यक्तिरेखा दत्ता भगत समांतरपणे मांडतात. सोनल व हेमाची मानसिकता, त्याच्या मनातील भावनिक गोंधळ तटस्थपणे नाटककार मांडतात. सतीशची वांझ विचार करणारी कृतीहीन पांढरपेशी

व्यक्तिरेखा नाटककार प्रभावीपणे मांडतात. नाटकात आंतरजातीय विवाहाचा विषय कुटूंबाबरोबर सामाजिक स्तरावरही काका, दासराव व अरूणकडून चर्चिला गेला आहे. सामाजिक स्तरावरील दलित सवर्ण संघर्ष कौटुंबिक स्तरावरील दलित सवर्ण मानसिकतेवर प्रभाव टाकतो याचे चित्रणही सोनल, अर्जुन व दासराव यांच्या व्यक्तिरेखेतून निदर्शनास येतो.

'कोण म्हणतं टक्का दिला?' नाटकातील पौराणिक काळातील व्यक्तिरेखा शुक्राचार्य, देवयानी, कच आणि इतर राक्षस या पूर्णत: पुराण काळातील न दाखवता त्याच्या तोंडी हिंदी, इंग्रजी मिश्रित मराठी भाषा देवून त्यांना आधुनिक प्रचलित काळाचा संदर्भ देण्यात आला आहे. नाटकाच्या दूसऱ्या प्रवेशात कचाचे कचऱ्या म्हणून आगमन व आधुनिक काळातील कमलाकर, विमला, सुकन्या, सुदर्शन या व्यक्तिरेखेबरोबर समाजातील नाडकर्णीसारख्या व्यक्तिरेखा नाटककाराने रेखाटल्या आहेत. सुदर्शन व कचऱ्या यांच्यातील चर्चेतून समाजातील स्थितीचे व एकंदरीत मानसांच्या जातीय मानसिकतेचे दर्शन घडविले आहे. कचऱ्याची व्यक्तिरेखा प्रभावी झालेली आहे. मात्र त्याला पुराणकाळातील कचाचे संदर्भ लागल्याने काल्पनिक व रंजनपर बनलेली आहे.

'बामनवाडा' तील व्यक्तिरेखा वास्तव व जिवंत वाटतात. तात्या, माई, श्रीकांत, शशी, भालचंद्र साठे, अशोक मोरे, पाटील, राधा काकू, भिवा, आई या सर्व व्यक्तिरेखा आपल्या स्वभावासहित आपले सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ घेवून नाटकात वावरताना दिसतात. तात्याची सुधारणावादी व्यक्तिरेखा ढोंगी व हतबल चित्रित करण्यात नाटककार यशस्वी झाला आहे. पेशवाईचे वंशज म्हणून स्वत:बद्दल स्वत:च्या ब्राह्मण्याबद्दल गर्वाने बोलणारी माई आपला कर्मठपणा नाटकात शेवटपर्यंत टिकवून ठेवताना दिसते. विद्रोही दलित युवकाची भूमिका नाटककार अशोक मोरेच्या व्यक्तिरेखेतून चित्रित करतात. पाटील, राधाकाकू ,माई या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून जातीयता स्पष्ट करतात. या व्यक्तिरेखा समाजात वावरणाऱ्या व्यक्तीप्रमाणे जिवंत वाटतात. भालचंद्र साठे ही व्यक्तिरेखा समाजापासुन दूरावणाऱ्या दलित युवकाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. तर नाटकात भिवा, आई या व्यक्तिरेखा वाचकांना भावनिक बनवितात. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मांडलेला आंतरजातीय विवाह हा केवळ कौटूंबिक स्तरावरील चित्रण करतो. शशी या व्यक्तिरेखेची ताठर पण परिवर्तन मनापासुन स्विकारण्याची भूमिका नाटककार मांडतात. 'बामनवाडा' नाटकातील व्यक्तिरेखा या वाचकांच्या भावना उद्दिपित करून वाचकांची वैचारिकता न वाढविता वाचकांना भावनिक करतात.

एकंदरीत चारही नाटकातील व्यक्तिरेखांचा इतर तीन नाटकातील व्यक्तिरेखेपेक्षा जास्त प्रभावी व विचार प्रवृत्त करणाऱ्या आहेत. शिवाय नाटकातील आंतरजातीय विवाह व सामाजिक स्तरावरील जातीय संघर्ष या व्यक्तिरेखाच्या वास्तव चित्रणाने विचारास प्रवृत्त करून वाचकाचे पर्यायाने समाजाचे प्रबोधन करते.

एका नाटकात अनेक घटनाप्रसंग असू शकतात. ते एकमेकांशी संबंधित असून त्यातून संघर्ष निर्माण होवून या घटनाप्रसंगाना विशिष्ट आकार प्राप्त होतो. नाटकाचे आकर्षण नाटकातील प्रखर नाट्यप्रसंगांमुळे निर्माण होते. 'कन्यादान' नाटकात प्रखर असे नाट्यप्रसंग आहेत. नाटकाचे काही घटनाप्रसंग प्रत्यक्ष रंगमंचावर घडतात तर काही घटना पडद्यामागे घडून त्याचे पडसाद पडद्यावर उमटतात. 'कन्यादान' नाटकात आंतरजातीय विवाह केलेल्या सुकन्या व अरूण यांची राहणीमान, व्यसनाधीन अवस्थेत अरूणने सुकन्याला केलेली मारहाण, सुकन्याचे दवाखन्यात भरती होणे हे प्रसंग पडद्यामागे घडतात मात्र पडसाद रंगमंचावर उमटतात. 'वाटा पळवाटा' नाटकातील दलित दलितेत्तर संघर्ष, शेवंताचे जळून मरणे, कॉलेज व सतीशच्या घरावर काढलेला मोर्चा या ही घटना पडद्यामागे घडतात. 'कोण म्हणतं टक्का दिला?' मधील टोराचे कवायती करणे तसेच 'बामणवाडा' यातील आईला मुलाने दगड मारणे, दंगल होणे या घटना पडद्यामागेच घडतात या सर्व घटनांचे पडसाद रंगमंचावर चर्चात्मक स्वरूपात होताना दिसतात.

'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?' व 'बामनवाडा' नाटकातील घटनाप्रसंगाचा विचार करता आंतरजातीय विवाहाच्या समस्यांच्या दृष्टीने येणारे घटनाप्रसंग प्रामुख्याने 'बामनवाडा' नाटकात प्रभावीपणे प्रकट झाले आहेत. 'कन्यादान', 'बामनवाडा' या नाटकातील दलित नायकाच्या सवर्ण घरातील प्रवेशाचे प्रसंग सारखेच आहेत. 'कन्यादान' नाटकात ज्योती अरूणची ओळख, परिचय करून देण्यासाठी साठेला वाड्यात घेवून येते. 'कन्यादान' मध्ये ज्योती अरूणबरोबर विवाहानंतर निघून जाते त्यामुळे त्या विवाहाने होणाऱ्या संघर्षाचे पडसाद केवळ रंगमंचावर दिसतात. तर इतर तीन नाटकामध्ये आंतरजातीय वैवाहिक जीवन व त्यातील समस्या रंगमंचावर दाखविलेल्या आहेत.

'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?' आणि 'बामनवाडा' या तीन दलित नाटकातील घटनाप्रसंग पांढरपेशी जातीय मानसिकता उघडी पाडणारे आहेत. आंतरजातीय विवाहाची समस्या कौटुंबिक व सामाजिक स्तरावर चढत्या क्रमाने मांडण्यात 'बामनवाडा' सरस ठरते. 'कन्यादान' नाटकात मांडलेली समस्या एकांगी व अपूर्ण

वाटते. मात्र रामनाथ चव्हाणांनी वास्तव सामाजिकतेचा, मानवी प्रवृत्तीचा, संस्कार व संस्कृतीचा आधार घेवून 'बामणवाडा' नाटकात ही समस्या मांडण्यासाठी घटनाप्रसंगाची रचना चढत्या क्रमाने केल्याचे स्पष्ट होते. उदा. प्रथम साठेच्या वाड्यातील प्रवेश, भिवाचे बामणवाड्यात येणे त्याच्या प्रती साठेची वागणूक, आईचा वाड्यातील प्रवेश तिचा अप्रत्यक्ष होणारा छळ यामुळे शशीबरोबर त्याच्या वागण्यातील फरक या सर्व घटनांचा क्रम नाटककार समस्येला उठाव देण्यासाठी करतात.

संवाद हे नाटकाचे माध्यम आहे. संवादाद्वारे नाटककार कथानिवेदनाचे व स्वभाव रेखाटनाचे काम करीत असतो. संवादातून नाट्यवस्तूची उभारणी होते. नाटकातील संवादाच्या दृष्टीने विचार करता चारही नाटकात संवाद व्यक्तिरेखानुसार त्या व्यक्तिच्या एकदंरीत सामाजिक व सांस्कृतिक वातावरणानुसार निर्माण केलेले दिसतात. काही संवादासाठी वापरलेली भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदा. 'कोण म्हणतं टक्का दिला?' नाटकातील संवादाची भाषा ही पौराणिक पात्राच्या तोंडी इंग्रजी, हिंदीमिश्रित भाषा आहे. "इतक्या दिवसांच्या वॉर नतंरही देवलोक स्टील फायटिंग विथ अस"[१६] अशा संवादातून नाटकात मनोरंजकता येते. 'बामनवाडा' नाटकातील दलित व्यक्तिरेखा भालचंद्र साठे यांच्या तोंडी संवाद केवळ प्रमाण पांढरपेशी मराठी भाषेतील आहेत व इतर तीनही नाटकातील दलित व्यक्तिरेखा ग्रामीण मराठी भाषा संवादासाठी वापरताना दिसतात. यातून रामनाथ चव्हाण प्रामुख्याने बदलत असलेला दलित तरूण दाखविण्याचा प्रयत्न करतात. उच्चवर्णीय, पांढरपेशी व्यक्तिरेखाच्या संवादासाठी नाटककार प्रमाण मराठी भाषा वापरतात. संवाद व संवादाच्या भाषेचा योग्य वापर चारही नाटकात आहे. प्रभावी असे संवाद 'वाटा पळवाटा' नाटकात असल्याचे जाणवते. 'महार म्हटलं तर शिवी ठरते आणि बामण म्हटलं तर तर काय तो माझा गौरव होतो. जात मोडून विवाह केलाय मी समजून उमजून ती शिवीच आहे माझ्यासाठी माझी विटंबना करणारी. जो तो आपापल्या जातीच्या क्रुर नख्यांनी ओरबडतो मला. कधी सावधपणे कधी बेसावधपणे हेतू कोणताही असेल पण प्रत्येक घाव एकेक जखम करतो मला. आहे पर्वा कोणाला ह्याची. वाटतय कुणाला आपली चुक झाली असं जे वास्तव मी डोळ्यानं स्वीकारलंय ते सहन करण्याच बळ माझ मलाच मिळवावं लागेल."[१७] हा हेमाचा संवाद मानवाच्या मनातील खोल दडलेल्या दु:खावर भाष्य करते. आंतरजातीय विवाहाने निर्माण होणारी खरी समस्या व त्यामागील दु:ख हेमाच्या संवादातून व्यक्त होते. तसेच काकाच्या व्यक्तिरेखेतील सामाजिक व्यवहारही दृष्टीआड करता येत नाही. या विवाहाने आपल्या जातीतील एका मुलीचे नुकसान झाले हे ते रोखठोकपणे स्पष्ट करतात. इतर नाटकातील

संवाद 'वाटा पळवाटा' नाटकाच्या मानाने प्रभावी वाटत नाहीत. 'कन्यादान' नाटकातील संवाद नाटककार एका विशिष्ट दिशेने, ठराविक परिणामाच्या दृष्टीने घडवतात तर 'बामणवाडा' तील संवाद ताठर वैचारिक भूमिका नसणारे, जास्त भावनिक आहेत. तर 'कोण म्हणतं टक्का दिला?' तील संवाद मनोरंजक व प्रभावी नसणारे आहेत.

चारी नाटकाचा साकल्याने विचार करता असे म्हणता येईल की 'कन्यादान', ' वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?' आणि 'बामनवाडा' या नाटकात आंतरजातीय विवाहाची समस्या वेग-वेगळया दृष्टीने मांडलेली आहे आंतरजातीय विवाहाची समस्या मांडत असताना नाटककार त्याबरोबर एक वेगळी सामाजिक समस्या समोर ठेवतो व वास्तविक मानवी मानसिकता उघडी पाडतो. मात्र 'बामनवाडा' हे रामनाथ चव्हाण यांचे नाटक प्रखरपणे आंतरजातीय विवाहाच्या समस्येवर प्रकाश टाकते व मुलत: कौटुंबिक स्तरावर या विवाहाने होणारी मानसिक, भावनिक कुचंबना स्पष्ट करूनही भविष्यात जातीविरहीत माणूसपण जपणाऱ्या पिढीचा आशावाद व्यक्त करण्यात हे नाटक यशस्वी झाले आहे.

## ३. निष्कर्ष :

'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?', व 'बामनवाडा' या अनुक्रमे विजय तेंडुलकर, दत्ता भगत, संजय पवार व रामनाथ चव्हाण यांच्या नाटकांचा आंतरजातीय विवाहाची समस्या या दृष्टीने विचार करता खालील निष्कर्ष हाती येतात.

१) साहित्य आणि समाज यांचा सहसंबंध लक्षात घेता हे स्पष्ट होते की, साहित्याचा समाजावर व समाजाचा साहित्यावर परिणाम होत असतो म्हणून आंतरजातीय विवाह या सामाजिक समस्येचे चित्रण मराठी नाटकातून झालेले दिसून येते.

२) नाटकाचे सामाजिक मूल्यमापन करताना नाटककाराची सामाजिक बांधिलकी व समाजसापेक्ष दृष्टिकोन तपासणे आवश्यक आहे. म्हणून तेंडुलकरांच्या 'कन्यादान' नाटकातील मांडणीवरून असे म्हणता येईल की तेंडुलकर विशिष्ट समाजाची बांधिलकी मानतात. समाजातील सर्व घटकांचा साकल्याने, सर्व समावेशक विचार करत नाहीत.

३) दत्ता भगत हे 'वाटा पळवाटा' नाटकातून दलित व सवर्ण समाजाचे समतोल चित्रण करतात. मात्र हा समतोल साधताना दलितांची विद्रोही भूमिका एकीकडे रेखाटताना त्याच दलितांची पांढरपेशी भूमिका स्पष्ट करतात व संघर्षापासून दूर

राहू पाहणारा दलित अपरिहार्यपणे संघर्षात खेचला जातो मात्र सवर्णांची परंपरागत भूमिका कुठेही खंडीत न झाल्याचे वास्तव चित्रण दत्ता भगत करतात.

४) 'कोण म्हणतं टक्का दिला?' हे पवारांचे मिथकावर आधारित नाटक असले तरी या नाटकातून प्रयोग करून आंतरजातीय विवाहाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला असला तरी हे नाटक व्यवसायाभिमुख असल्याचे व रंजनपर झाल्याचे जाणवते. संजय पवार या सामाजिक समस्येला गांभीर्याने मांडताना दिसत नाहीत त्यामुळे त्यांची बांधिलकी व्यवसायाशी निगडित आहे असे म्हणता येते.

५) 'वामनवाडा' नाटकात आंतरजातीय विवाहाची समस्या मांडताना दलित युवकाची मनोवृत्ती दाखवून समस्या निर्मितीमागे असणाऱ्या संकुचित विचारसरणीवर प्रकाश टाकला आहे. रामनाथ चव्हाण ही समस्या मांडताना वैचारिकतेऐवजी भावनिकतेवर जास्त भर देताना दिसतात.

६) 'बामनवाडा' मध्ये या समस्येचे वास्तव चित्रण घडते. 'बामनवाडा', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?' या दलित नाटकातून शेवटी आशावाद जोपासलेला दिसत असला तरी नाटककारांची सामाजिक बांधिलकी पडताळता असे लक्षात येते की, 'बामनवाडा' व 'वाटा पळवाटा' ही दलित नाटके दलित रंगभूमिकडे न जाता प्रस्थापित रंगकर्मीकडे गेल्यामुळे दलित रंगभूमीला उतरती कळा लागली हे वास्तव नाकारता येत नाही.

७) नाटकाच्या रचनेच्या, मांडणीच्या दृष्टीने तेंडुलकरांचे 'कन्यादान' नाटक इतर तीन नाटकापेक्षा जास्त सरस ठरते. नाटकाची मांडणी करताना प्रवेश व अंक याची रचना नाटकातील आंतरजातीय विवाहामुळे कुटूंबातील व्यक्तीवरील वाढणारे ताणतणाव चित्रित करणारे आहेत.

८) चारही नाटकातील घटनाप्रसंगाचा विचार करता बामनवाड्यातील घटनाप्रसंग प्रत्येक वेळी आंतरजातीय विवाहाच्या समस्येला उठाव देणारे आहेत.

९) 'वाटा पळवाटा'? 'कोण म्हणतं टक्का दिला?' या नाटकातील घटनाप्रसंग नाटकाच्या इतर आशयाला जास्त महत्त्व देणारे आहेत.

१०) 'वाटा पळवाटा' नाटकातील व्यक्तिरेखा दत्ता भगत यांनी प्रभावीपणे उभ्या केल्या आहेत. शिवाय प्रत्येक व्यक्तिरेखा एक विशिष्ट वैचारिक भूमिका घेवून नाटकात वावरताना दिसतात.

११) 'कन्यादान', 'वाटा पळवाटा', 'कोण म्हणतं टक्का दिला?' 'बामनवाडा' नाटकातील तर व्यक्तिरेखा वास्तव जिवंत असल्या तरी त्या बहुतांशी भावनेच्या

आहारी जाणाऱ्या (उदा. बामनवाड्यातील) किंवा अपरिपक्व ('कोण म्हणतं टक्का दिला?') अशा आहेत.

१२) वाचकांना विचारप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य दत्ता भगत यांच्या 'वाटा पळवाटा' नाटकातील व्यक्तिरेखेत आहे. संवादाच्या दृष्टीने ही 'वाटा पळवाटा' नाटकातील समर्थ ठरते. वैचारिक भूमिकेवर सामाजिक भान असलेले संवाद, व्यक्तिरेखानुसार वदलणारे संवाद दत्ता भगत प्रभावीपणे मांडतात.

१३) चारही नाटकांतील संघर्ष नाटकाच्या कथानकाला अनुसरून घडताना दिसतो. आंतरजातीय विवाहाच्या दृष्टीने निर्माण होणारा संघर्ष याचा विचार करता 'बामनवाडा' नाटकातील संघर्ष कौटूंबिक व वाड्याच्या माध्यमातून सामाजिक रूप धारण करताना दिसतो.

१४) 'बामनवाडा'तीला घटनाप्रसंग भावनिक असले तरी होणारा भावनिक संघर्ष तोही आंतरजातीय विवाहाने निर्माण झालेला प्रभावीपणे मांडला गेला आहे.

१५) चारही नाटकात या विवाहाला समाजाबरोबर समाजात असणाऱ्या जातीय मानसिकते बरोवर संघर्ष करावा लागतो. समाजातील जातीय मानसिकता दोन भिन्न जातीचे एकत्रिकरण स्विकारू शकत नाही. त्यामुळे समाज अशा विवाहाने वैचारिक पातळी वाढवून प्रतिष्ठा देताना दिसत नाही असे चित्रण नाटककार करतात.

१६) चारही नाटकांतील आंतरजातीय विवाह हे प्रेमसंबंधातून घडून आलेले दाखविलेले आहेत. असे विवाह वैचारिक पातळी वाढवून होताना दिसत नाहीत. त्यातही 'कन्यादान' मध्ये आंतरजातीय विवाहाने होणारे दुष्परिणाम दर्शविले आहेत तर इतर तीन दलित नाटकांत आंतरजातीय विवाहाकडे आशावादी दृष्टीने पाहून एकसंघ, समताधिष्ठित समाजाची रचना मांडलेली दिसते.

१७) तेंडुलकर आंतरजातीय विवाहाची समस्या 'कन्यादान' मध्ये चित्रित करताना दलित नायक व्यक्तिरेखा विकृत चित्रित करतात मात्र दलित नाटकात कुठेही आंतरजातीय विवाहाची मांडणी करताना नायिका विकृत चित्रित होताना दिसत नाही. त्यातून दलित नाटककाराचा समाजाप्रती असणारा व्यापक, सर्वसमावेशक दृष्टीकोन स्पष्ट होतो.

१८) चारही नाटकात उच्चकुलीन वधू व कनिष्ट कुलीन वर यांच्यात आंतरजातीय विवाह घडून येताना दिसतात. उच्च कुलीन वर व कनिष्ठ कुलीन वधू असा

आंतरजातीय विवाह घडताना दिसत नाही. नाटकातील सामाजिक समस्येचे चित्रण लक्षात घेता आंतरजातीय विवाहाचा एकांगीपणा लक्षात येतो.

## संदर्भ :


| | | |
|---|---|---|
| १) सहस्त्रबुद्धे अविनाश | - | 'समाज आणि साहित्य' लोकवाङ्मय गृह मुंबई. प्रथम आवृत्ती १९८० पृ.क्र.४ |
| २) तेंडुलकर विजय | - | 'कन्यादान' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई तिसरी आवृत्ती १९९४ पृ.क्र.४६ |
| ३) भगत दत्ता | - | 'वाटा पळवाटा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे चौथी आवृत्ती २००२ पृ.क्र.१० |
| ४) भगत दत्ता | - | उनि.पृ.क्र.४८ |
| ५) पवार संजय | - | 'कोण म्हणतं टक्का दिला?' निलकंठ प्रकाशन, पुणे आवृत्ती पहिली पृ.क्र.४९ |
| ६) पवार संजय | - | उनि पृ.क्र.४९ |
| ७) पवार संजय | - | उनि पृ.क्र. ४७ |
| ८) पवार संजय | - | उनि पृ.क्र.३० |
| ९) चव्हाण रामनाथ | - | 'बामनवाडा' श्री विद्या प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १९९१ पृ.क्र.७६ |
| १०) चव्हाण रामनाथ | - | उनि पृ.क्र.३४ |
| ११) चव्हाण रामनाथ | - | उनि पृ.क्र.६४ |
| १२) चव्हाण रामनाथ | - | उनि पृ.क्र.५० |
| १३) चव्हाण रामनाथ | - | उनि पृ.क. ८३ |
| १४) अनंत कान्हो | - | 'मराठी नाटक १९७५ ते १९९५' 'प्रदक्षिणा' खंड दूसरा, अनिरूद्ध अनंत कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती १९९१ पृ.क्र.१०१ |
| १५) डॉ.कानडे मु.श्री. | - | 'नाटयशोध' नीहारा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९८७ पृ.क्र.३ |
| १६) पवार संजय | - | उनि पृ.क्र. ५ |
| १७) भगत दत्ता | - | उनि पृ.क्र. ४८ |